# नागरिकांच्या सहभागातून मेट्रो ३ लगत वृक्षारोपण

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** मुंबई मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनच्या (एमएमआरसी) वतीने मेट्रो ३ मार्गिकेच्या स्थानकांवर आणि स्थानकांच्या परिसरात वृक्षारोपण केले जाणार आहे. नागरिकांच्या सहभागातून हा उपक्रम राबवण्याचा एमएमआरसीचा मानस आहे.

मेट्रोच्या बाहेरील भागात नागरिकांच्या सहभागातून वृक्षारोपण करण्याचा एमएमआरसीचा प्रयत्न आहे. सरकारी/खासगी कार्यालये, निवासी संकुले, शैक्षणिक संस्था, रुग्णालये इत्यादी आस्थापनांना या उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन एमएमआरसीने केले आहे.